# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/मनपा-२०१८/प्र.क्र.३०/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २८ फेब्रुवारी, २०२२

## आ दे श

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांची प्रक्रीया कर्तव्यदक्ष व निष्पक्ष: अधिकाऱ्यांद्वारे हाताळण्याबाबत तसेच आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी पोलिस व इतर विभागांमार्फत होण्याकरीता प्रतिबंधत्मक उपाययोजना राबविण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाच्या समक्रमांकाच्या दि. ३१/०७/२०१८ च्या आदेशान्वये सविस्तर कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे.

२. सदर आदेशातील मुददा क्र. ८.१ (iv) मध्ये ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक असेल, संबंधित अधिकारी त्या जिल्हयाचा रहिवाशी असू नये, अशी तरतूद आहे. मात्र, निवडणूक आयोगाच्या असेही निदर्शनास आले आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांकरीता सदर तरतुदीमुळे निवडणूक निर्णय अधिकारी / सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तसेच इतर अधिकारी पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाहीत. आगामी काळात मोठया प्रमाणावर ग्रामीण तसेच शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणूका होणार असून निवडणूक कामकाजाकरीता अधिकारी उपलब्ध होण्यात मोठी अडचण उदभवणार आहे. राज्यभरातील सर्व जिल्हयात तसेच महापालिका व नगर पालिकेत निवडणूक कामकाजासाठी अधिकारी उपलब्ध होत नाहीत या कारणासाठी निवडणूक कामकाजात अडथळा निर्माण होणारी परिस्थिती उदभवू नये, आणि आयोगाला निवडणूक प्रक्रिया

सुलभतेने व कालमर्यादेत पार पाडता यावी याकरीता राज्य निवडणूक आयोगाच्या दि. ३१/०७/२०१८ च्या आदेशातील मुद्दा क्र. ८.१ (iii) व (iv) बदलून खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे:-

"८.१ (iii) - **स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत संपण्याच्या दिनांकास ज्या अधिकाऱ्यांना सध्याच्या पदावर ३ वर्षे अथवा जिल्हयात ४ वर्षे पूर्ण होत असतील अशा अधिकाऱ्यांना निवडणूकीचे काम देण्यात येवू नये. हा निकष जिल्हा संवर्गातील कर्मचा-यांच्या बाबतीत बंधनकारक राहणार नाही**."

"८.१ (iv) - अधिकाऱ्यांच्या रहिवासाबाबत, जो प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षरीत्या निवडणूकीशी संबंधीत असेल, अशा अधिकाऱ्यांची नेमणूक करताना खालील निकष पाळणे आवश्यक आहे;

१. महानगरपालिकेची निवडणूक असल्यास त्या महानगरपालिकेचा रहिवाशी असू नये.
२. पंचायत समिती/नगर परिषद/नगर पंचायत/ग्रामपंचायत निवडणूक असल्यास त्या संबंधीत तालुक्याचा रहिवाशी असू नये.
३. जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक असल्यास त्या निवडणूकीच्या कामकाजाच्या दृष्टीने संबंधित तालुक्याचा रहिवाशी असू नये. मात्र जर अशी व्यक्ती जिल्हाधिकारी स्तरावरून संपूर्ण जिल्हा परिषद व त्याअंतर्गतच्या सर्व पंचायत समित्यांचे कामकाज पाहत असेल तर त्या संबंधीत जिल्हयाचा रहिवाशी असू नये.
४. वरील निकष जिल्हा संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत बंधनकारक राहणार नाही.
५. राज्य मुख्यालयात कार्यरत असणाऱ्या कोणत्याही अधिकारी/कर्मचारी यांना वरील निकष लागू राहणार नाहीत. "

३.	राज्य निवडणूक आयोगाचे दि. २३/०२/२०२२ चे आदेश रद्द करण्यात येत असून यापुढील सर्व निवडणूकांसाठी या दि. २८/०२/२०२२ च्या आदेशातील तरतूदी लागू राहतील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव(२), नगर विकास विभाग, , मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, ग्राम विकास  व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
७. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून)
९. सर्व महापालिका आयुक्त
१०. सर्व अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
११. निवड नस्ती.